महावितरण
email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
**४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.**
**दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११**

जा.क्र. : औसंवि/ब/क्रीडा/ २५०९६ दिनांक : १५/०५/२०१४.

# परिपत्रक

विषय : अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महावितरण कंपनीतील खेळाडू, संघ व्यवस्थापक व संघ प्रशिक्षक यांना पुरविण्यात येणाऱ्या सुधारीत सुविंधाबाबत.

संदर्भ : परिपत्रक क्र. काऔसंवि/ब/क्रीडा/गणवेश/३४४९४, दि. १०/९/२००८

*************

अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या (AIESCB) क्रीडा स्पर्धेत महावितरण कंपनीचे विविध खेळांचे संघ प्रतिवर्षी सहभागी होत असतात. सदर स्पर्धांच्या उद्घाटन प्रसंगी संचालना (मार्चपास्ट) मध्ये सहभागी होताना महावितरणचा संघ एकसारखा व शिस्तबद्ध दिसावा याकरिता संघातील खेळाडू व संघ व्यवस्थापक यांना तत्कालीन मंडळाचे प्रशासकीय परिपत्रक क्र. १४१ दि. १९/०४/१९९४ तसेच संदर्भातील परिपत्रकानुसार **दर दोन वर्षातून एकदा** खेळांच्या स्पर्धांसाठी गणवेश उदा. नायलॉन ट्रॅकसूट, खेळाचे बूट व नायलॉन मोजे पुरविण्याची तरतूद असून त्याकरिता रु. १०००/- पर्यतच्या खर्चाची तरतूद देखील करण्यात आलेली होती.

संघातील खेळाडूंची निवड, ही त्यांच्या निवड चाचणीतील गुणात्मक पातळीवर तसेच सराव शिबीरातील कामगिरीवर अवलंबून असल्यामुळे उपरोक्त स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संघातील काही खेळाडू प्रतिवर्षी बदलत असतात. एका वर्षी पुरविण्यात आलेल्या गणवेशाचा वापर खेळाडू कर्मचारी इतर विभागीय राज्यस्तरीय स्पर्धांसाठी तसेच नियमित सरावासाठी करीत असल्याने तो जीर्ण होतो व पुढील वर्षी स्पर्धेतील संचालना (मार्चपास्ट) मध्ये वापरण्या योग्य रहात नाही. त्यामुळे प्रतिवर्षी खेळाडूंना गणवेश पुरविण्यात येऊन त्यासाठीच्या खर्चाच्या तरतूदीमध्ये देखील वाढ करण्यात यावी ही बाब प्रशासनाच्या विचाराधीन होती.

आता, व्यवस्थापकीय संचालक, महावितरण यांनी संचालक (वित्त) व कार्यकारी संचालक (मासं) यांच्याशी विचारविनियम करुन अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाच्या क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महावितरण कंपनीतील खेळाडू, संघ व्यवस्थापक व संघ प्रशिक्षक यांना पुरविण्यात येणाऱ्या सुधारीत सुविंधाबाबत खालीलप्रमाणे मंजूरी प्रदान केलेली आहे.

१) **खेळाडू कर्मचारी, संघ व्यवस्थापक तसेच संघ प्रशिक्षक यांना प्रतिवर्षी खेळाचा गणवेश खरेदी करण्यासाठी देण्यात येणारी रक्कम ही प्रत्येकी रु. २,५००/- अथवा प्रत्यक्ष खर्च यापैकी जी कमी असेल ती रक्कम अदा करण्यात यावी.**

२) खेळाडू, संघ व्यवस्थापक तसेच संघ प्रशिक्षक यांना एकत्रीत प्रवास करणे शक्य व्हावे तसेच संघ भावना व संघाचा आत्मविश्वास वाढीस लागावा आणि स्पर्धेदरम्यान त्यांनी खेळाचे अतिउच्च प्रदर्शन दाखवावे, यास्तव राज्यस्तरीय स्पर्धा व इतर मान्यताप्राप्त स्पर्धा तसेच अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाद्वारा (AIESCB) आयोजित स्पर्धेत त्यांना भारतातील कुठल्याही राज्याच्या विद्युत मंडळांतर्गत आयोजित स्पर्धेत सहभाग घ्यावा लागतो त्यामुळे तातडीच्या क्षणी द्वितीय श्रेणीमध्ये आरक्षण मिळत

नसल्याने **खेळाडू, संघ व्यवस्थापक तसेच संघ प्रशिक्षक यांना स्पर्धेसाठी जाण्या व येण्याकरिता ते कोणत्याही वेतनगटात किंवा वेतनश्रेणीत मोडतात याचा विचार न करता सर्वांना एक सारखा म्हणजेच वातानुकुलीत तृतीय श्रेणी (III Tyre AC) प्रवास भत्ता देण्यात यावा.**

**३)** अखिल भारतीय विद्युत क्रीडा नियंत्रण मंडळाद्वारा (AIESCB) आयोजित तसेच मान्यताप्राप्त स्पर्धा व राज्यस्तरीय स्पर्धेसाठी **खेळाडू कर्मचारी संघ व्यवस्थापक व संघ प्रशिक्षक यांना सांघिक कार्यालयाच्या कार्यालयीन आदेशास अनुसरुन संबंधीत कार्यालयाकडून तातडीने कार्यमुक्त करण्यात यावे.**

वरीलप्रमाणे सुधारीत तरतुदींच्या अमलबजावणीचा निर्णय सदर परिपत्रक प्रसारीत झालेल्या तारखेपासून अमलात येईल. सदर परिपत्रकास विस्तृत प्रसिध्दी द्यावी.

~~सदर~~ सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या INTRANET - RAPDRP- Infoportal या संकेतस्थळावर Circular -Industrial Relations Department येथे प्रसिध्द करण्यात आले आहे.

किशोर पवार

(किशोर पवार)
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रत सविनय सादर :

१) संचालक (वित्त), महावितरण, प्रकाशगड, मुंबई.
२) कार्यकारी संचालक (मासं), महावितरण, प्रकाशगड, मुंबई.
३) मुख्य महाव्यवस्थापक (मासं) / (तां. आस्था.), महावितरण, प्रकाशगड, मुंबई.

प्रत :
महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे सर्व विभाग प्रमुख.

प्रत रवाना :

क्षेत्रीय कार्यालयांतील सर्व उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी व सहाय्यक महाव्यवस्थापक (मासं).